International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.1 Sept - Oct 2014

# स्त्रीयांच्या राजकीय सबलीकरणात महिला राजसत्ता आंदोलन संघटनेची भूमिका

**श्रीमती छाया भारत सकटे**
कला वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

**प्रस्तावना :**

महिला राजकीय सबलीकरण म्हणजे महिलांना राजकीय क्षेत्रात समान संधी, प्रतिनिधित्व आणि निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करणे. भारतीय संविधान (कलम १४, १५ आणि १६) महिलांना समानता आणि भेदभावापासून संरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. स्थानिक पातळीवर महिला राजकीय सबलीकरण म्हणजे गाव, तालुका आणि शहर स्तरावर महिलांना नेतृत्व आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे धोरण आहे. भारतात पंचायती राज व्यवस्थेने यामुळे मोठी चालना दिली आहे, विशेषतः १९९२च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायतींमध्ये महिलांसाठी ३३% जागा राखीव ठेवल्या. काही राज्यांनी (जसे की महाराष्ट्र, बिहार) हे प्रमाण ५०% पर्यंत वाढवले आहे. यामुळे आज देशभरात सुमारे १४ लाख महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आल्या आहेत. स्थानिक पातळीवर महिला सक्षमीकरणाने भारताच्या ग्रामीण आणि शहरी भागात सकारात्मक बदल घडवले आहेत. पण हे खरे सबलीकरण तेव्हाच होईल जेव्हा महिला केवळ संख्या म्हणून नाही, तर स्वतंत्र आणि प्रभावी नेत्यां म्हणून पुढे येतील. यासाठी सरकार, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजे असल्याने यातील स्वयंसेवी संस्थांनी महत्वाची भूमिका बजावत आहे. या स्वयंसेवी संस्थेमधील सातारा जिल्ह्यातील परिसरात कार्य करणाऱ्या राजसत्ता आंदोलन संघटनेचे स्वरूप व कार्याचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला जाणार आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

१. महिला सबलीकरण संकल्पनेचा अभ्यास करणे.
३. महिला राजसत्ता आंदोलन या महिला संघटनेचा अभ्यास करणे.
४. महिला राजसत्ता आंदोलनाचे स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणातील भूमिका अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धती वापर केला असून या प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आणि सर्वेक्षणात्मक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग करुन महिला संघटनाचे अध्ययन करण्यात आले आहे.

सबलीकरण ही संकल्पना

सबलीकरण ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची व आवश्यक आहे. महिलांचे सबलीकरण ही बहुआयामी व बहुमुखी वैशिष्टये असणारी प्रक्रिया आहे. सर्व पातळीवर महिलांचा विकास होण्याशी निगडीत अशी ही कल्पना आहे. अस्तित्वात असणाऱ्या भौतिक व मानवी संसाधनावर नियंत्रण ठेवणे त्यामध्ये वाटा मिळविणे हे महिला सबलीकरणामध्ये महत्त्वाचे सूत्र आहे. लोपेझ व झहिदी यांनी महिला सबलीकरण मोजमापासाठी खालील पाच महत्त्वाचे निर्देश सांगितले आहेत.

१. **आर्थिक निर्देश-** यामध्ये महिलांना काम करण्याची मिळणारी संधी आर्थिक स्थिती यांचा समावेश होतो.
२. **शैक्षणिक निर्देश-** शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण साक्षरता शिक्षण मिळण्याची संधी इत्यादी.

३. **आरोग्य निर्देश -** बाल जन्म मृत्यू दर स्त्रियांची प्रसुतीची सुरक्षा, स्त्रियांचे आरोग्य माता बाल संगोपन इत्यादी.

४. **लोकसंख्या निर्देश** -स्त्रियांचे लोकसंख्येमधील प्रमाण, जन्म दर, स्त्रियांवरील होणारे अत्याचार व हिंसा इत्यादी.

५. **राजकीय निर्देश -** महिलांचे मतदानाचे प्रमाण, निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सबलीकरण म्हणजे राजकीय, सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक आणि सांस्कृतिक यांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे. (Patel, Vibhuti, 2009 : 7)

सर्वच पातळीवर महिलांचा विकास होणे ही एक महत्त्वाची बाब आहे. अस्तित्वात असणाऱ्या भौतिक व मानवी संसाधनांवर नियंत्रण ठेवणे, त्यामध्ये मिळवणे हे महिला सबलीकरणातील महत्त्वाचे सूत्र आहे. यातून स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला तरच त्यांना सार्वजनिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल व पर्यायाने त्यांचे सबलीकरण होईल. सबलीकरण म्हणजे स्त्रियांचा निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे. आधुनिक काळात प्रगत समाज म्हणजे ज्या समाजात मानवी संसाधनाची ही प्रगती करण्यामध्ये समान संधी तसेच समान वाटा मिळतो अशा समाजाला प्रगत किंवा विकसित समाज म्हटले जाते. कोणत्याही समाजाच्या चिरंतन सामाजिक व आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व घटकांचा समावेश असला पाहिजे. या दृष्टीने शाश्वत विकासाठी स्त्रियांना बरोबरीने विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेतले पाहिजे. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना सहभागाची समान संधी मिळाल्याने महिलांच्या राजकीय सबलीकरणाला गती मिळाली आहे.

भारतीय लोकशाही बळकट होण्यासाठी महिलांचे राजकीय सबलीकरण महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे समाजकारण, राजकारण, अर्थकारण, आरोग्य, शैक्षणिक आणि संस्कृतीकरण या सबलीकरणांच्या तत्त्वांचा समग्रपणे विचार करताना स्त्री अभ्यास या नव्याने विकसित झालेल्या ज्ञान शाखेला योगदान देण्याचे काम महिला संघटनांनी केले आहे. यासाठी समाजातील अनेक महिला संघटना स्त्री विषयाचे आत्मभान व राजकीय भान जागृत करण्याचे काम करीत असतात. त्यामुळे विविध देशातील सरकारांनी विविध आयोग नेमून आपापल्या देशातील स्त्रियांच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे. याचा परिणाम म्हणून शासकीय धोरणात काही अंशी बदल झाला व स्त्री सबलीकरणाचा अर्थ समाजात रूजायला लागला. हा अर्थ समाजात रूजवण्यासाठी गेली अनेक वर्षे महिला संघटना कार्यरत आहेत. त्यातील महिला राजसत्ता आंदोलनची कार्य प्रणाली पुढीलप्रमाणे आहे.

**महिला राजसत्ता आंदोलन :**

'रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट' ची स्थापना सन १९९४ मध्ये एक तळागाळातील मोहीम म्हणून एका समाजाच्या दृष्टिकोनाकडे चालना देणारी संस्था म्हणून करण्यात आली जिथे वंचित घटकांना समान आणि योग्य संधी सुनिश्चित केल्या जातात जेणेकरून ते सन्मान, न्याय आणि स्वातंत्र्यात जगतात. आरएससीडीचा असा विश्वास आहे की 'विकास ही मुळात लोकांना शोषक परिस्थिती आणि वंचितांपासून मुक्त करण्याची प्रक्रिया आहे'. आज विकासासाठी संसाधन आणि समर्थन केंद्र विकास एजन्सी, संघटना, शैक्षणिक आणि संशोधन संस्था, धोरण निर्माते, वकिली सहयोग, मोहीम आणि समस्या समर्थनासाठी आमदारांपर्यंत पोहोचले आहे. या सर्व घटकांनी एकत्रित होऊन संघटन स्थापन केले. अशा पद्धतीने महिला आरक्षणामुळे गाव विकासाचे नेतृत्व करण्याची मिळालेली संधी आणि या संधीला जबाबदार नेतृत्वात रूपांतर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाची जोड मिळाल्याने होणारे फायदे या अनुषंगाने २००० साली महिला राजसत्ता आंदोलन संघटना स्थापन झाली. या संघटनेचा विस्तार जवळ-जवळ महाराष्ट्र भर आहे. सातारा जिल्हयातील जावळी, सातारा आणि कोरेगाव या तीन तालुक्यांमध्ये या संस्थेचे काम चालते. महिलांना सर्व स्तरातील निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळाला पाहिजे.

**महिला राजसत्ता आंदोनाची उद्दिष्टे :**

- महिला संघटनेची कार्यपध्दती ही गावातील प्रश्न गावात सोडवणे आणि गावातील महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे संस्था सुरू करण्यामागील मुख्य उद्देश आहेत.
- पंचायती राज संस्थामध्ये निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग सुनिश्चित करण्याच्या प्रमुख पायऱ्यांमध्ये महिला सभांचे आयोजन करण्यापासून ते सत्तेच्या विकेंद्रीकरणापर्यंत टप्प्याटप्प्याने सहभाग आवश्यक आहे.
- जिल्हा स्तरावर जिल्हा पंचायत महिला आघाडी ही महिलांना प्रशिक्षण, विविध कार्यशाळांचे आयोजन आणि शासकीय निर्णय गावापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम केले जाते.
- जिल्हा स्तरावर जिल्हा पंचायत महिला आघाडी ही महिलांना प्रशिक्षण, विविध कार्यशाळांचे आयोजन आणि शासकीय निर्णय गावापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम केले जाते.
- महिला सभा नियमितपणे आयोजित केल्या जात आहेत परंतु सर्व गावांमध्ये नाही.

**महिला राजसत्ता आंदोलनाचे क्षेत्र उपक्रम**

ग्रामसभा गौरव अभियान, महिलांसाठी १०% राखीव बजेटवर मोहीम, महिला नेतृत्व कार्यशाळांची मालिका, निवडणूकपूर्व प्रचार, महिला नेत्यांची ग्रामपंचायत दर्शन मोहीम, अनुकूल समर्थनासाठी पती आणि कुटुंबीयांचा सत्कार, महिला सभेद्वारे घरांची संयुक्त मालकी, तळागाळातील समस्या ओळखण्यासाठी ग्रासरूट स्कॉलरशिप, विधानसभा अध्यक्ष आणि धोरणकर्त्यांशी संवाद, आर्थिक आणि राजकीय प्रशासनासाठी महिला राजसत्ता आंदोलनाचे सहयोग, लोकार्पण मोहीम आंदोलनात लोकनेतृत्व सुरू करण्यासाठी, निवडणुकीत सर्जनशील सहभाग इत्यादी कार्यक्षेत्र निश्चित केले.

**महिला राजसत्ता आंदोलनामार्फत पंचायती राज संस्थामध्ये महिलांच्या सहभाग विषयक कार्य:**

निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग सुनिश्चित करण्याच्या प्रमुख पायऱ्यांमध्ये महिला सभांचे आयोजन करण्यापासून ते सत्तेच्या विकेंद्रीकरणापर्यंत टप्प्याटप्प्याने सहभाग आवश्यक आहे, या दृष्टिने महिला राजसत्ता आंदोलन कार्य करते.

- महिला सभा नियमितपणे आयोजित केल्या जात आहेत.
- महिलांच्या सहभागामुळे गावाच्या विकास प्रक्रियेला गती मिळाली आहे.
- महिला सरपंचांचा आत्मविश्वास वाढला आहे.
- सरकारी यंत्रणा खालच्या स्तरावर कार्यरत झाल्या आहेत.
- ध्वजारोहणासाठी महिला मोठ्या संख्येने जातात.
- महिलांमध्ये राजकीय क्षमतांचा विकास
- ग्रामपंचायतीच्या प्राधान्यक्रमात बदल
- महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाने पंचायत राज व्यवस्थेला नवी दिशा दिली आहे
- ग्रामसभा सर्वसामान्यांच्या निर्णयाचे केंद्र बनल्या आहेत
- महिला केंद्रीत धोरणांसाठी समर्थन आणि बदल
- सत्तेच्या विकेंद्रीकरणाबाबत लोकांमध्ये वाढती जागरूकता

महिला राजसत्ता आंदोलनाच्या कार्यप्रणालीमुळे धोरण स्तरावर प्रभाव निर्माण करण्यात ही संघटना सक्षम झाली आहे. यानुसार ग्रामसभेला प्रभावी अधिकारांचे वाटप करण्याची महिलांची मागणी राज्य सरकारने मान्य केली आणि डिसेंबर २००२ रोजी कायदा लागू झाला. महिलांची ग्रामसभा आता सर्वसाधारण ग्रामसभेपुढे अनिवार्य करण्यात आली आहे. निलंबित ग्रामसभेचा प्रश्न सोडवण्यासाठी योग्य त्या सुधारणा करण्याचे राज्य सरकारने मान्य केले आहे. महिलांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी

बी.डी.ओ. यांना तालुका बैठकांना पुरेशी प्रसिद्धी देण्याची सूचना केली जाते. तीन-चतुर्थांश बहुमताने अविश्वास प्रस्तावाद्वारे महिला सरपंचाला पदमुक्त करणे बंधनकारक केले आहे, त्यामुळे वैधानिक तरतुदींच्या अयोग्य आणि लिंग-पक्षपाती वापरावर आळा बसेल. प्रायोगिक तत्त्वावर ग्रामसेविका राबविण्यास राज्य सरकारने सहमती दर्शवली आहे. महिलांसाठीच्या दहा टक्के बजेटची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल. शासकीय समित्यांकडून जागा वाटपासाठी महिला मंडळांना दिले जाणारे प्राधान्य इतर समित्यांमध्येही वाढविण्यात यावे. एमआरए लॉबिंगचा परिणाम म्हणून राज्य सरकारने एक ठराव जारी केला आहे की, ध्वजारोहण महिलांनी करणे आवश्यक आहे.

**महिला राजसत्ता आंदोलनाचे महिलांचे राजकीय सबलीकरणातील योगदान :**

**१. महिला सभाचे नियमित आयोजन :**

ग्रामपंचायतीत नियमितपणे महिला सभा आयोजित करणे आवश्यक असले तरी सर्व गावांमध्ये या सभा नियमित होत नसल्याचे दिसून येतात. त्यामुळे महिला राजसत्ता आंदोलनाच्या कार्यातून संपर्कात असलेल्या गावांमध्ये महिला सभा नियमित होऊ लागल्या असून त्याद्वारे त्यांना महिलांना राजकीय सहभाग वाढू लागला आहे.

**२. महिलांच्या सहभागामुळे गावाच्या विकास प्रक्रियेला गती :**

महिलांशी संबंधित विविध प्रश्न सोडवण्यासाठी विकासात्मक धोरण राबवण्यात आले आहे. तसेच या विकास प्रक्रियात महिलांना मध्यवर्ती स्थान देऊन संस्था या महिलांच्या मध्ये गावांच्या विकासाविषयक संवाद व चर्चा घडवून आणते. महिलांचा गाव विकासाच्या धोरणात सहभाग झाल्याने त्यांच्यात राजकीय जागृतीने निर्माण झाली. यातून विकसित नेतृत्व निर्माण झाले आहे.

**३. महिला सरपंचांच्या आत्मविश्वात वाढ :**

या संस्थेच्या कार्याने महिलांचा राजकीय आत्मविश्वास वाढवला आहे. परिणामी महिला सरपंचांवरील अविश्वास ठरावाची वारंवारता कमी झाली आहे. तसेच यापूर्वीच्या महिला सरपंचांनी दुसऱ्यांदा निवडणूक लढवण्यास नकार दिला होता. मात्र आता ते दुसऱ्यांदा निवडणूक लढवण्यासाठी पुढे येत आहेत असा सकारात्मक बदल संस्थेच्या प्रयत्नाने झालेला दिसतो.

**४. ध्वजारोहनासाठी महिला मोठ्या संख्येने सहभाग :**

पूर्वी महिला सरपंचांना ध्वजारोहन करू दिले जात नव्हते, पुरुष मंडळींकडून त्यांची खिल्ली उडवली जात होती. सामान्यतः ग्रामपंचायतीचे काही पुरुष सदस्य किंवा काही प्रस्थापित पारंपरिक नेते ध्वजारोहन करत असत. मात्र आज संस्थेच्या प्रयत्नाने महिला सरपंच केवळ ध्वजारोहनच करत नाहीत तर गावातील इतर महिलांनाही सोबत घेऊन ध्वजारोहण करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**५. महिलांमध्ये राजकीय क्षमतांचा विकास :**

महिलांच्या राजकीय नेतृत्व क्षमता वाढत आहेत. त्यांना वेगवेगळ्या परिषद व कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांना राजकीय व्यवस्थेबाबत जागृत करतात. यातून त्यांच्या राजकीय क्षमतेचा विकास झाला आहे.

**६. ग्रामपंचायतीच्या प्राधान्यक्रमात बदल :**

आज गावांच्या विकासाच्या अजेंड्यामध्ये महिलांच्या समस्यांना प्राधान्य दिले जाते उदा.: केवळ रस्त्याचे काँक्रिटीकरण, लॅम्पपोस्ट इत्यादीला महत्त्व नाही तर पाणी, आरोग्य, शिक्षण इ. यातून मुलभूत सोयी हा गाव विकासाचा प्राधान्यक्रम राहिला आहे.

**७. महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाने पंचायत राज व्यवस्थेला नवी दिशा दिली आहे :**

महिलांच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय सहभाग वाढल्यामुळे स्तब्ध आणि निष्क्रिय ग्रामप्रशासनाला चालना मिळाली आहे. तसेच या महिलांना संस्थेमुळे राजकीय व प्रशासकीय प्रशिक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग सक्रीय झाला आहे.

**८.महिला केंद्रीत धोरणांसाठी समर्थन आणि बदल**

संस्थेमार्फत महिला केंद्रीत धोरणांसाठी लॉबिंग करण्यात मोहीम यशस्वी झाली आहे. धोरणांमधील या सकारात्मक बदलांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना धोरण राबवताना मदत झाली आहे.

**महिला राजसत्ता आंदोलनाची आव्हाने**

महिला राजसत्ता आंदोलनाची आव्हाने ही भारतीय संदर्भात अनेक स्तरांवर दिसून येतात. हे आंदोलन महिलांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात समानता आणि सत्ता मिळवून देण्यासाठी लढते, परंतु त्याला अनेक अडथळयांचा सामना करावा लागतो.

**खालीलप्रमाणे ही काही प्रमुख आव्हाने आहेत:**

- **पितृसत्ताक मानसिकता**:
  भारतीय समाजात खोलवर रुजलेली पितृसत्ताक व्यवस्था हे सर्वात मोठे आव्हान आहे. महिलांना नेतृत्वाची जबाबदारी घेण्यासाठी अनेकदा पुरुषप्रधान संस्कृतीतून विरोध होतो. राजकारणात महिलांना गंभीरपणे घेतले जाण्याऐवजी त्यांच्याकडे प्रतीकात्मक किंवा दुय्यम भूमिकेसाठीच पाहिले जाते.
- **शिक्षण आणि जागरूकतेचा अभाव** : ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये अजूनही महिलांमध्ये शिक्षणाचा प्रसार मर्यादित आहे. यामुळे राजकीय प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आवश्यक असलेली जागरूकता आणि आत्मविश्वासाचा अभाव दिसतो. अशिक्षितपणामुळे महिला आपले हक्क आणि संधींबाबत अनभिज्ञ राहतात.
- **आर्थिक अवलंबित्व**: महिलांना स्वतंत्रपणे राजकारणात उतरण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्याची गरज असते. परंतु, अनेक महिला आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून असतात, ज्यामुळे त्यांचा निर्णय घेण्याचा अधिकार आणि राजकीय सहभाग मर्यादित होतो.
  **संस्थात्मक अडथळे :** राजकीय पक्षांमध्ये महिलांना उमेदवारी देण्यासाठी फारशी उत्सुकता दिसत नाही. पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव आणि पुरुषांचे वर्चस्व यामुळे महिलांना नेतृत्वाच्या संधी मिळणे कठीण होते. तसेच, निवडणूक प्रक्रियेत लागणारा प्रचंड खर्च हा देखील एक मोठा अडथळा आहे.
- **सामाजिक दबाव आणि हिंसा** :राजकारणात सक्रिय होणाऱ्या महिलांना कौटुंबिक आणि सामाजिक दबावांचा सामना करावा लागतो. काही ठिकाणी त्यांना हिंसाचार, छळ किंवा बदनामीला तोंड द्यावे लागते, ज्यामुळे अनेक महिला मागे हटतात.
- **कायदेशीर आणि धोरणात्मक मर्यादा**: जरी महिला आरक्षण विधेयकासारखे कायदे प्रस्तावित झाले असले, तरी त्यांची अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे झालेली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये५०% आरक्षण असले तरी ते विधिमंडळापर्यंत विस्तारलेले नाही. तसेच, कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने त्याचा फायदा मर्यादित राहतो.
- **प्रतिनिधित्वाची गुणवत्ता**: काहीवेळा महिला नेत्यांना "प्रॉक्सी" म्हणून वापरले जाते, जिथे त्या केवळ नावापुरत्या असतात आणि खरे निर्णय पुरुषच घेतात. यामुळे खऱ्या अर्थाने सबलीकरणाला बाधा येते.

**निष्कर्ष :**

- ग्रामसभेला प्रभावी अधिकारांचे वाटप करण्याची मागणी राज्य सरकारने मान्य केली आणि डिसेंबर २००२ रोजी कायदा लागू झाला.
- राज्य सरकारने पंचायत राजमध्ये महिलांसाठी जिल्हास्तरीय सल्लामसलत केंद्रे सुरू करण्याचे मान्य केले आहे.
- सर्वसाधारण ग्रामसभेपुढे आता महिला ग्रामसभा अनिवार्य करण्यात आल्या आहेत.

- निलंबित ग्रामसभेचा प्रश्न सोडवण्यासाठी योग्य त्या सुधारणा करण्याचे राज्य सरकारने मान्य केले आहे.
- महिलांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी ब्लॉक मीटिंगला पुरेशी प्रसिद्धी द्यावी, असा सल्ला ब्लॉक विकास अधिकाऱ्यांना दिला जातो.
- तीन-चतुर्थांश बहुमताने अविश्वास प्रस्तावाद्वारे महिला सरपंचांना पदमुक्त करणे अनिवार्य केले आहे, त्यामुळे वैधानिक तरतुदींच्या अयोग्य आणि लिंगभेदी वापरावर आळा बसेल.
- राज्य सरकारने प्रायोगिक तत्त्वावर महिला ग्रामसचिवांना नियुक्ती देण्याचे मान्य केले आहे.
- शासनाकडून जमीन वाटपासाठी महिला गटांना प्राधान्य देण्यात येईल.
- सध्या पाणीपुरवठा आणि पाटबंधारे उपसमित्यांना लाभलेले आर्थिक अधिकार इतर समित्यांनाही वाढवण्याचे आहेत.

अशा प्रकारे महिला राजसत्ता आंदोलनाला यशस्वी करण्यासाठी सामाजिक मानसिकता बदलणे, शिक्षणाचा प्रसार करणे, आर्थिक स्वातंत्र्याला चालना देणे आणि कायदेशीर सुधारणा प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी सरकार, समाज आणि स्वतः महिलांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**

१. वातार उषा, (१ जानेवारी १९७७), “भारतातील स्त्री-मुक्ती चळवळ - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप”, लेख ‘बायजा’ मासिक प्रकाशित, पुणे.

२. लोकसत्ता, (११ एप्रिल २०१५) ‘महिला चळवळीचा उदय’, दिनिक वृत्तपत्र , पुणे .

३. भागवत विद्युत, (१ मे १९८९), “महाराष्ट्रातील स्त्रियांच्या चळवळीचा आढावा”,परामर्श, खंड ११ अंक १, विद्यापीठ तत्वज्ञान विभाग प्रकाशन, पुणे ISSN : 0376-415X

४. पटेल विभुती, (१९९१), “स्त्री चळवळी संबधी दृष्टिकोण : प्रश्न आणि संबध”, लेख ‘बायजा’ मासिक प्रकाशित, पुणे.